| | |
|---|---|
| MHSN060009272021 | R.C.S.142/2021<br>Dilip Dadu Kamble Vs. Savitribai Gulab Kamble |

## निशाणी २६ वरील आदेश

**०१.** प्रस्तुत अर्ज वादीतर्फे प्रतिवादी नं. १ सावित्रीबाई गुलाब कांबळे यांचे वारस नोंद करणेस झालेला विलंब माफ होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी नं. १ सावित्रीबाई गुलाब कांबळे यांचे दिनांक २०.०४.२०२४ रोजी निधन झालेले आहे. सदर प्रतिवादी हे पुणे येथे राहत होते आणि त्यांचे पुणे येथेच निधन झालेले आहे. त्यांच्या मृत्यूची नोंद पुणे येथे झालेली आहे. त्यामुळे वादीस त्यांचा मृत्यू दाखला लवकर उपलब्ध झाला नाही. तसेच दरम्यानच्या काळात वादी यांच्या वैयक्तिक व घरगुती अडचणींमुळे तसेच त्यांच्या घरातील आजारपणामुळे त्यांना वकिलांशी भेटून आवश्यक ती पूर्तता मुदतीत करु शकले नाहीत. त्यामुळे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी ८ महिन्यांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब वादीने जाणीपूर्वक केला नाही. सबब वादीने सदरचा अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

**०२.** प्रतिवादीतर्फे सदर अर्जास म्हणणे दाखल करुन आक्षेप घेतला आहे. त्यांचे पुढे कथन आहे की, अर्ज खोटा व चुकीचा आहे. वादीने मयत प्रतिवादी नं. १ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास जाणूनबुजुन विलंब केलेला आहे. अर्जातील कारण संयुक्तिक नसलेने अर्ज नामंजूर करणेत यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

**०३.** वादीचा अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. युक्तीवाद ऐकला.

**०४.** प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द कायम व कारक ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. वादीने सदर अर्जांच्या सोबत स्वतःचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. वादी यांच्या अर्जात नमूद केलेल्या कारणांमध्ये प्रथमदर्शनी तथ्य असल्याचे दिसून येते. तसेच सदर अर्ज मंजूर केलेस प्रतिवादींचे नूकसान होणार नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायाला अनुसरुन व दोन्ही पक्षकारांचे हित लक्षात घेवून सदर अर्ज मंजूर होणे योग्य होणार आहे. त्यामुळे दोन्ही

पक्षकारांमधील असलेला वाद संपुष्टात आणणेसाठी व न्यायदानासाठी मदत होईल. दाव्याचे स्वरुप व अर्जात नमुद केलेली हकीकत लक्षात घेता माझ्या मते, दाव्याचा गुणदोषावर अंतिम निर्णय होणेसाठी प्रस्तुत अर्ज मंजूर करणे उचित होईल. मात्र वादीने मयत प्रतिवादी नं. १ यांचे वारस अभिलेखावर घेणेस केलेला विलंब दुर्लक्षित करता येणार नाही. त्याकरीता त्यांचेवर कॉस्ट लावणे अभिप्रेत आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | प्रस्तुत अर्ज कॉस्टची रक्कम रुपये २००/– प्रतिवादींना देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | वादीने वारस अभिलेखावर घेण्यास केलेला विलंब माफ करणेत येत आहे. |

ANIRUDHA SUNIL RANE

Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE

(अनिरुध्द एस. राणे)

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, मिरज.

ठिकाण –मिरज.

दिनांक –२२.०८.२०२५.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mr. S. S. Shingana |
| Name of Court | :- | Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Miraj, Dist.Sangli. |
| Date of decision / typed | :- | 22.08.2025 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 22.08.2025 |
| Judgment/order uploaded on | :- | 22.08.2025 |